# सरदार सुर्याजी काकडे सारथी वाहन चालक कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम

या उपक्रमा अंतर्गत तरुण – तरुणींना लाईट मोटर व्हेईकल (LMV) व हेवी ट्रान्सपोर्ट व्हेईकल (HMV) यांचे वाहन चालवण्याचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. या उपक्रमास सन २०२४-२५ मध्ये १५०० प्रशिक्षणार्थींची मान्यता घेण्यात आली आहे.

| **योजनेचे / उपक्रमाचे नाव** | **सरदार सुर्याजी काकडे सारथी वाहन चालक कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम** |
|---|---|
| **उपक्रमाचा उद्देश :** | प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना रोजगार व स्वयं रोजगाराच्या संधी मिळणार आहेत. |
| **उपक्रमाचे स्वरूप** | OFFLINE |
| **प्रशिक्षण ठिकाण** | कासारवाडी, जुना मुंबई – पुणे महामार्ग, पुणे |
| **लाभार्थी संख्या** | १५०० |
| **लाभार्थी पात्रता** | १) उमेदवार हा लक्षित गटातील मराठा, कुणबी, कुणबी-मराठा आणि मराठा-कुणबी असावा.<br><br>२)उमेदवार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा.<br><br>३) उमेदवार हा नॉन- क्रिमिलेयर गटातील असावा.<br><br>४)उमेदवाराकडे सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणित केलेले जात प्रमाणपत्र असावे. (मराठा जातीच्या उमेदवाराकडे जातीचे प्रमाणपत्र नसल्यास EWS किंवा मराठा जातीचा उल्लेख असलेली १० वी पासची टी. सी. प्रमाणपत्र जोडावे).<br><br>५) उमेदवाराने ऑनलाइन ॲप्लिकेशन सोबत आवश्यक प्रमाणपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे.<br><br>६) निवड केलेल्या कोर्ससाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे. |

| | |
|---|---|
| | ७) उमेदवाराचे वय २० वर्ष पूर्ण ते ४५ वर्ष दरम्यान असावे. |
| **शैक्षणिक अर्हता** | इयत्ता १० वी उत्तीर्ण |
| **आवश्यक कागदपत्रे** | १) विहित नमुन्यातील व फोटोसहीत परिपूर्ण अर्ज २) विहित नमुन्यातील प्रतिज्ञा पत्र ३) प्रशिक्षणानुसार आवश्यक शैक्षणिक गुणपत्रक व प्रमाणपत्र (किमान दहावी पास) ४) जातीचे प्रमाणपत्र ५) नॉन क्रिमिलेयर उत्पन्नाचे प्रमाणपत्र ६) जन्म दाखला ७) शाळा सोडल्याचा दाखला ( टी सी / एल सी ) ८) रहिवाशी प्रमाणपत्र ९) आधारकार्ड १०) उमेदवार हा लक्षित गटातील ( मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी ) असावा. |
| **प्रशिक्षण कालावधी / टप्पे** | १ महिना |
| **लाभार्थी निवड प्रक्रिया** | प्राप्त अर्जामधून निकषांच्या आधारे अर्जाची छाननी करून उमेदवारांची निवड केली जाते. |
| **लाभाचे स्वरूप** | उमेदवाराच्या अभ्यासक्रमाचे संपूर्ण प्रशिक्षण शुल्क सारथी संस्थेमार्फत भरले जाते. |
| **कोचिंग संस्था निवड** | |
| **अर्जदार प्रवेशासाठी अपात्र कोणत्या बाबी पूर्तता न झाल्यास ठरेल** | आवश्यक सर्व कागदपत्रांची पूर्तता न केल्यास तसेच, उमेदवार सारथी लक्षित गटातील नाही हे सिद्ध झाल्यास अर्जदार अपात्र ठरेल. |
| **योजना सारथीच्या कोणत्या विभागीय कार्यालयामार्फत राबविली जाते (कार्यालयाचे नाव)** | पुणे या सारथीच्या विभागीय कार्यालयामार्फत राबविली जाते. |